# शमशोनपर्यंत पोहोचणे



अंधकारमय मनांना शिकवण्याची तत्त्वे

## डॅटसन ब्राउन

# शमशोनपर्यंत पोहोचणे

अंधकारमय मनांना शिकवण्याची तत्त्वे

डॅटसन ब्राउन

जोडी जोन्स आणि करेन प्रिन्ससाठी

Maranathamedia.com

ऑगस्ट २०२५

ह्या पुस्तकाचे मराठी अनुवाद भाऊ जोएल एलिझाबेथ साळवी ह्यांनी केले आहे.
तसेच पुनर्वाचनासाठी भाऊ आदित्य वैद्य ह्यांनी मदत केली आहे

# सामग्री

युद्धाचा प्रश्न....................................................................................4
इस्राएली लोकांना शस्त्रे कुठून मिळाली?..............................................................5
पिता आपल्यावर विश्वास न ठेवणाऱ्या मुलांशी कसा वागतो?.............................. 8
युद्धखोर दृष्टीकोन घट्ट रूजतो..........................................................................14
देव युद्धाच्या दृष्टिकोनातून इस्राएलाशी बोलतो............................................ 16
तुम्ही जसा न्याय करता, तसा तुमचाही न्याय होईल........................................19
इस्राएल राजाची मागणी करतो..........................................................................22
कृपा वाढावी म्हणून आपण पाप करत राहावे काय?..........................................26
शमशोनचा अधार्मिक विवाह आणि इस्रायलची नैतिक स्थिती...........................27
शमशोन जबड्याच्या हाडाने हजारांना मारतो................................................. 30
देवाने ते केले आहे असे गृहीत धरून.................................................................33
शमशोनची योसेफाशी तुलना........................................................................... 37

# युद्धाचा प्रश्न

हा प्रश्न वारंवार उपस्थित होतो की जुन्या करारात दिसणारी आणि जणू देवाच्या संमतीने घडलेली सर्व हिंसा कश्यामुळे आहे? जेव्हा येशू म्हणतो, “तुमच्या शत्रूंवर प्रेम करा,” आणि शत्रूंवर प्रेम करणं म्हणजे नक्कीच त्यांना ठार मारणं नव्हे, तेव्हा आपण हे कसं समजून घ्यायचे? हा एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे, आणि असा प्रश्न आपल्या मनात असावा, अशी देवाची इच्छा आहे. ‘देवाचा आत्मा शमशोनावर आला आणि मग त्याने एक हजार माणसे ठार मारली’ या कथेकडे वळण्याआधी मला काही मूलभूत तत्त्वे स्पष्ट करायची आहेत.

जेव्हा आपण युद्धांचा इतिहास आणि इस्राएली लोकांनी आपल्या सभोवतालच्या शत्रूंशी केलेल्या लढाया पाहतो, तेव्हा आपल्याला या समस्येच्या मूळ कारणापर्यंत पोहोचावे लागते. मिसरमधून बाहेर पडलेल्या इस्राएलीं लोकांबद्दल काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात.

त्यांनी वारंवार असं गृहित धरलं की देव त्यांना वाचवणार नाही, किंवा अगदी त्यांना ठार मारू इच्छितो, जरी त्यांच्याकडे देव त्यांना मदत करत असल्याचे असंख्य पुरावे होते. त्यांनी त्याच्या योजनेवर विश्वास ठेवला नाही.

ते मोशेला म्हणाले, “मिसरात काय कबरा नव्हत्या म्हणून तू आम्हांला येथे रानात मरायला आणले? आम्हांला तू मिसरातून बाहेर आणले ते काय म्हणून? आम्ही तुला मिसरात नव्हतो का म्हणत की आम्ही आहोत ते ठीक आहोत. आम्हांला मिसरी लोकांची गुलामगिरी करीत राहू दे? येथे रानात मरून जावे त्यापेक्षा मिसरी लोकांच्या गुलामगिरीत राहणे परवडले असते.”

मोशे लोकांना म्हणाला, “भिऊ नका. स्थिर उभे राहा आणि परमेश्वर आज तुमचे जे तारण करील ते पाहा, कारण ज्या मिसरी लोकांना तुम्ही आज पाहत आहात ते पुन्हा कधीही तुमच्या नजरेस पडणार नाहीत. परमेश्वर तुमच्यासाठी लढेल; तुम्ही शांत राहा.” निर्गम १४:११-१४

या घटनेनंतर, ते विजयाचे गाणे गातात ज्यामध्ये "परमेश्वर युद्धाचा पुरूष आहे: परमेश्वर त्याचे नाव आहे." ही ओळ समाविष्ट आहे. इस्राएली लोकांना हे योग्यरित्या समजले काय? आपल्याला माहित आहे की देवाचे मार्ग आपले मार्ग नाहीत (यशया ५५:८-९), म्हणून जेव्हा तो युद्ध करतो तेव्हा ते आपण कसे युद्ध करतो त्यासारखे नसते. युद्धाने कनान जिंकण्याची देवाची योजना होती काय? आपण तलवारीने देवाची वचने पूर्ण करावीत अशी त्याची योजना आहे काय? इस्राएलला असे वाटले:

कनान मिळवण्यासाठी देव त्यांच्या प्रयत्नांसोबत कार्य करेल, याच्या सामर्थ्यावर त्यांनी विश्वास ठेवला नाही; परंतु आता मात्र त्यांनी दैवी मदतीशिवाय, फक्त स्वतःच्या शक्तीच्या जोरावर हे काम पूर्ण करण्याचा धाडसी प्रयत्न केला. “आम्ही परमेश्वराविरुद्ध पाप केले आहे,” त्यांनी हाक मारली; “आम्ही वर जाऊन लढू, जसे परमेश्वर आपला देव आम्हाला आज्ञा देतो.” (अनुवाद १:४१). पापामुळे ते इतके भयंकर आंधळे झाले होते. प्रत्यक्षात परमेश्वराने त्यांना “वर जाऊन लढा” असे कधीच सांगितले नव्हते. त्याचा हेतू हा नव्हता की त्यांनी युद्ध करून ती भूमी मिळवावी, तर त्याच्या आज्ञांचे काटेकोर पालन करून ती मिळवावी अशी त्याची इच्छा होती. (पीपी ३९२.३)

आज्ञापालन हीच खरी गुरुकिल्ली होती. त्यांच्या तारणासाठी कायदा किती आवश्यक आहे हे त्यांना समजायला हवे होते, आणि देव, आपला पिता, याला ओळखून व प्रेम करून त्यांनी त्या कायद्यावर प्रेम करायला हवे होते. यासाठी त्यांना स्वतःच्या पापीपणाची जाणीव होणे आवश्यक होते आणि आपल्याला ठाऊक आहे की ही गोष्ट मानवी मनासाठी सोपी नाही कारण “शारीरिक मन देवाविरुद्ध वैर धरते; ते देवाच्या कायद्याला अधीन होत नाही, आणि होऊही शकत नाही.” (रोमकरांस ८:७).

इस्राएली लोकांना देव दयाळू आहे, चांगला आहे आणि प्रत्यक्षात त्यांची काळजी घेणार आहे, यावर विश्वास नव्हता. अडचणीची पहिली चाहूल लागताच ते गृहित धरत की देव त्यांना शिक्षा करणार आहे. या अविश्वासामुळे त्यांनी अशा चुकांची मालिका केली ज्यामुळे त्यांच्या मनाला

पिढयान्पिढ्या एका खोट्या विचारसरणीची चौकट मिळाली, आणि त्यातच ते अडकून राहिले.

## इस्राएली लोकांना शस्त्रे कुठून मिळाली?

जेव्हा इस्राएली मिसरमधून बाहेर पडले, तेव्हा त्यांच्या जवळ शस्त्रे नव्हती. ते प्रशिक्षित सैनिक नव्हते; ते एक सैन्य नव्हते. मग त्यांनी तलवार वापरण्यास सुरुवात कशी केली?

अशा प्रकारे परमेश्वराने त्या दिवशी मिसऱ्यांच्या हातातून इस्राएल लोकांना तारले आणि मिसरी लोक समुद्रतीरी मरून पडलेले इस्राएलांनी पाहिले. निर्गम १४:३०

इतिहासकार जोसेफस आपल्याला सांगतो की त्यांना ती शस्त्रे कशी मिळाली - लाल समुद्र पार करण्याच्या अद्भुत घटनेनंतर, इस्राएली लोकांचा पाठलाग करताना बुडालेल्या मिसरी सैनिकांची प्रेते किनाऱ्यावर येऊन लागली, आणि त्यांच्यापासून त्यांनी ती शस्त्रे मिळवली.

दुसऱ्या दिवशी मोशेने मिसरी लोकांची शस्त्रे गोळा केली, जी समुद्राच्या प्रवाहाने, आणि त्या प्रवाहाला अडथळा आणणाऱ्या वाऱ्याच्या जोराने, इब्री लोकांच्या छावणीत आणली गेली होती. आणि त्याने असा निष्कर्ष काढला की हेही दैवी कृपेनेच घडले असावे, जेणेकरून त्यांच्याकडे शस्त्रांची उणीव भासू नये. मग त्याने इब्री लोकांना ती शस्त्रे धारण करण्याची आज्ञा दिली आणि त्यांना सीनाय पर्वताकडे नेले, देवाला बलिदान अर्पण करण्यासाठी आणि लोकांच्या तारणासाठी अर्पणे सादर करण्यासाठी जसे त्याला आधीच करण्याची आज्ञा दिली गेली होती. – जोसेफस, अँटिक्विटीज ऑफ द ज्यूस,

त्या दिवशी इस्राएली लोकांनी एक फार गंभीर चूक केली, जेव्हा त्यांनी मरण पावलेल्या मिसरी सैनिकांच्या मृतदेहांवरील शस्त्रे घेण्याचा निर्णय घेतला. त्यांनी असा विचार करायला हवा होता की "आपण सैनिक नाही, आपल्याला शस्त्रांचा वापर कसा करायचा ते माहित नाही. परमेश्वर आपल्याला आजवर घेऊन आला आहे आणि आपल्याला कधीही स्वतः लढण्याची वेळ न येता देवाने आपल्याला वाचवले आहे. देवाने आपल्याला कनान देण्याचे वचन दिले आहे, आणि तोच ते आपल्याला देईल, तेदेखील आपल्या हातून कोणाचाही जीव न घेता."

परंतु देवावरचा अविश्वास आणि हा समज की तो कधीही त्यांना सोडून देईल आणि स्वतःचं रक्षण स्वतः करायला भाग पाडेल, यामुळे इस्राएली लोकांनी असा विचार केला की "नंतर पश्चात्ताप करण्यापेक्षा सावध राहणं चांगले." चला, या तलवारी आपण घेऊ या, फक्त काही घडलं तर. कारण, देव "युद्ध करणारा पुरुष" नाही काय? देवाने त्यांना इतक्या चमत्कारिक पद्धतीने वाचवल्यानंतरही त्यांच्या अंतःकरणात अविश्वास होता, हे आपल्याला माहीत आहे.

मग एलीम येथून कूच करून इस्राएल लोकांचा सर्व समुदाय मिसर देशातून निघाल्यावर दुसऱ्या महिन्याच्या पंधराव्या दिवशी एलीम आणि सीनाय ह्यांच्यामधल्या सीन रानात येऊन पोहचला. त्या रानात इस्राएल लोकांच्या सर्व मंडळीने मोशे व अहरोन ह्यांच्या संबंधाने कुरकुर केली.

इस्राएल लोक त्यांना म्हणू लागले की, "आम्ही मिसर देशात मांसाच्या भांड्याभोवती बसून भरपूर जेवत होतो तेव्हा आम्हांला परमेश्वराच्या हातून मरण आले असते तर पुरवले असते; पण ह्या सर्व समुदायाला उपासाने मारावे म्हणून तुम्ही आम्हांला ह्या रानात आणले आहे." निर्गम १६:१-३

मिसरमधील त्या महान अद्भुत चिन्हे आणि चमत्कारांनी भरलेल्या संकटांना अवघे सव्वा-दोन महिने झाले होते, आणि तरीही इस्राएली लोक असा विचार

करत होते की देव त्यांना मदत करणार नाही. त्यामुळेच स्वतःच्या बचावासाठी तलवारी घेण्याचा त्यांचा निर्णय काही आश्चर्यकारक नव्हता! देवाने त्यांना खायला आकाशातून मान्ना दिला होता, पण तरीही ते त्यांच्यासाठी पुरेसे नव्हते. परिस्थिती अशी झाली की, पाणी नसल्यामुळे त्यांनी मोशेला दगडांनी ठार मारायचे ठरवले. बायबलमध्ये कुठेही असे लिहिले नाही की त्यांनी पाण्यासाठी प्रार्थना केली. त्यांनी मोशेला त्यांच्या वतीने प्रार्थना करण्यासही सांगितले नाही. त्यांनी आपोआपच असे गृहित धरले की देव त्यांना मारू इच्छितो. तेव्हा मोशेने खडकावर प्रहार केला जो ख्रिस्ताचे प्रतीक होता आणि त्यातून त्यांना पाणी मिळाले.

मोशेने त्या ठिकाणाचे नाव मस्सा आणि मरीबा (मोह) (चिडवणे/भांडण) असे ठेवले, कारण इस्राएल लोकांनी तेथे कलह केला आणि “परमेश्वर आमच्यामध्ये आहे किंवा नाही” असे म्हणून परमेश्वराची परीक्षा पाहिली. अमालेकाबरोबर युद्ध मग अमालेक येऊन रफीदीम येथे इस्राएल लोकांशी लढू लागला. निर्गम १७:७

याच अविश्वास दाखवणाऱ्या घटनेनंतर लगेच इस्राएलाने मानवी बनवलेल्या शस्त्रांनी आपली पहिली लढाई लढली. अमालेकाने इस्राएलवर हल्ला केला, आणि इस्राएलाने देवावर सोपवण्याऐवजी स्वतःच्या शक्तीवर विश्वास ठेवून लढाई करण्याचे ठरवले. पण इस्राएल युद्धात प्रशिक्षित नव्हते. मग देवाने काय करावे? आपल्या लोकांना, कारण ते त्याचे मार्ग समजत नाहीत आणि मूर्ख मुलांसारखे वागत आहेत म्हणून, सोडून द्यावे काय? देव असा आहे काय?

नाही! देवाने पुन्हा एकदा या प्रसंगाचा उपयोग त्यांना त्याच्यावर अवलंबून राहायला शिकवण्यासाठी, त्यांना त्याच्याकडे परत आणण्यासाठी केला. त्याने त्यांच्या युद्धातील यशाचे कारण मोशेचे हात वर असणे, आणि अपयशाचे कारण मोशेचे हात खाली जाणे, असे दाखवले. देवाने त्यांच्या त्याच्याविषयी असलेल्या चुकीच्या समजुतींमधूनच काम करत, त्यांना आज्ञापालन शिकवण्याचा प्रयत्न केला. त्याने जे दिसत होते त्याचा उपयोग करून, जे दिसत नव्हते त्यावरील त्यांचा विश्वास वाढवण्याचा प्रयत्न केला.

देवाला माहीत होते की फक्त आज्ञापालनानेच त्यांना जीवन आणि शांती मिळू शकेल, आणि फक्त देवाच्या आज्ञांचे पालन करून मिळालेल्या जीवन आणि शांतीच्या अनुभवातूनच ते त्याच्यावर विश्वास, आणि श्रद्धा ठेवतील. जर देवाने फक्त एवढ्यामुळे की त्यांनी युद्धाचा मार्ग निवडला, त्यांना पूर्णपणे सोडून दिले असते, तर ते कधीच हे समजले नसते. ही गोष्ट देवाने माणसाशी केलेल्या समायोजनाच्या त्या अत्यंत महत्त्वाच्या तत्त्वाशी येऊन भिडते, जे ‘शिकाराचे उदाहरण’ यातून सुंदररीत्या स्पष्ट केले आहे.

# पिता आपल्यावर विश्वास न ठेवणाऱ्या मुलांशी कसा वागतो?

फ्रेड रायटने आपल्या Behold Your God या पुस्तकात या द्विधा अवस्थेचं एक अत्यंत प्रभावी उदाहरण दिलं आहे. यामुळे मला देवाला कसं वाटलं असेल याची खोल जाणीव झाली. आणि देवभक्त पालकांच्या इच्छेविरुद्ध, जगाचा प्रभाव मुलांवर पडत असलेल्या कोणत्याही परिस्थितीत हे उदाहरण तितकंच लागू होते.

“कल्पना करा एक लहानसं गाव आहे, जे अशा भागात वसलेलं आहे जिथे अस्वल, हरणं, डोंगरामधील बकऱ्या, आणि विविध प्रकारची मोठी वन्य मांजरे विपुल प्रमाणात सापडतात. अपेक्षेप्रमाणे, गावातील बहुतेक पुरुष हे उत्साही शिकारी आहेत एखादा शिकार मिळण्याची संधी ते कधीही सोडत नाहीत. बंदुका घेऊन ते जंगलात किंवा डोंगरात प्राण्यांचा जीव घ्यायला निघतात.

पण एक माणूस मात्र वेगळाच होता. त्याच्या हृदयात देवाचे प्रेम होते, आणि जंगलात व पर्वतात राहणाऱ्या त्या सुंदर प्राण्यांचा जीव घेणं त्याच्या स्वभावाच्या पूर्णपणे विरुद्ध होते. त्यामुळे रक्ताच्या साहसासाठी इतर पुरुषांच्या सोबत तो कधीही जाताना दिसला नाही.

त्या पुरुषांना मात्र हा विचित्र माणूस पटत नसे. ते त्याला आपल्या गटात सामील करण्याची एकही संधी सोडत नसत. एकदा तर त्यांनी त्याच्या वाढदिवसानिमित्त त्याला एक देखणी शिकारी बंदूक विकत घेतली. पण ख्रिस्ती नम्रतेने त्याने ती भेट सौम्यपणे नाकारली.

हे अर्थातच त्या पुरुषांना मनापासून न पटल्यामुळे त्यांनी त्याच्यावर आणखी दबाव आणायला सुरुवात केली. तरीदेखील, वर्षानुवर्षं त्याच्या वागण्यात काहीही बदल झाला नाही. शिकार करण्यासाठी तो फक्त एक चांगला कॅमेरा बाळगायचा इतकंच त्याचं 'शस्त्र' होते.

या माणसाला एक देखणा मुलगा होता, ज्याला तो शिकाऱ्यांच्या प्रभावापासून जपण्यासाठी फारच काळजी घेत होता. त्याच्यात वन्यजीवांबद्दलची स्वतःसारखीच प्रेमभावना निर्माण व्हावी म्हणून तो सतत प्रयत्नशील होता. आणि त्याला आनंद होता की यात तो यशस्वी ठरत आहे. अशा प्रकारे वडील आपल्या मुलाला शिकाऱ्यांच्या मार्गाऐवजी स्वतःच्या मार्गाने चालावे अशी इच्छा ठेवून प्रयत्न करत होता.

पण तरीही वडिलांनी मुलाचे स्वातंत्र्य कधी हिरावून घेतले नाही. जेव्हा तो तारुण्याच्या उत्तर टप्प्यात पोहोचला, तेव्हा तो स्वतःच्या जबाबदारीवर जगू लागला आणि वडिलांच्या थेट नियंत्रणाखाली किंवा शिस्तीत राहिला नाही. त्याच वेळी त्याला काही आठवडे घरापासून दूर राहण्याचे एक निमंत्रण आले. नवीन प्रदेश पाहण्याची उत्सुकता असल्यामुळे त्याने ते निमंत्रण आनंदाने स्वीकारले."

ही शिकाऱ्यांनी रचलेली एक चतुर योजना होती. त्यांनी आपल्या मुलांनाही सोबत नेले होते. त्यांना आशा होती की, एकदा हा मुलगा आपल्या वडिलांपासून दूर गेला की, त्यांच्या मुलांचा त्याच्यावर अधिक प्रभाव पडेल. त्या मुलांनी त्याला फक्त एकदाच शिकार करून पाहण्याची विनंती केली फक्त अनुभव घेण्यासाठी की त्याला ती कशी वाटते.

त्याला वाटलं की, शिकारीचा हा व्यवसाय एकदा प्रत्यक्ष पाहण्यात काही वाईट होणार नाही, म्हणून तो त्यांच्यासोबत गेला. सुरुवातीला त्याची प्रतिक्रिया नकारात्मक होती. पण त्या आव्हानात, थरारात आणि रोमांचात काहीतरी असं होतं की, त्याला ते आपल्याकडे खेचून घेत होते. आणि थोड्याच वेळात तो एक उत्साही आणि समर्पित शिकारी बनला.

तो क्रीडा सामानाच्या दुकानात गेला, तिथे एक सुंदर, अत्यंत कुशलतेने बनवलेली बंदूक निवडली, आणि काही दिवसांतच ती घेऊन आपल्या स्तब्ध आणि खिन्न झालेल्या वडिलांसमोर आला.

त्याने आपली निवड केली होती, आणि आता वडिलांसमोर अशी परिस्थिती उभी राहिली होती ज्याला प्रतिसाद द्यावाच लागणार होता. आता या घटनाक्रमाशी आपलं नातं ते कसं ठेवणार? हे स्पष्ट होते की, त्या तरुणाने आपल्या आयुष्यात असा मार्ग निवडला होता जो वडिलांच्या आणि देवाच्या मार्गांच्या पूर्णपणे विरुद्ध होता.

मुलाच्या वडिलांसाठी तसेच देवासाठी समोर काही पर्याय होते.

१. मुलाला नाकारणे.

पहिला पर्याय म्हणजे मुलाला नाकारणे म्हणजे त्याला घरात प्रवेश न देणे आणि त्याने स्वतःचा वेगळा मार्ग घ्यावा अशी अट घालणे. यासाठीचे औचित्य असं असू शकले की, वडिलांचे आणि मुलाचे तत्त्व कधीच एकत्र येऊ शकत नाहीत.

२. त्याला जबरदस्तीने शरण आणणे.

दुसरा मार्ग म्हणजे बळाचा वापर करून मुलाला वडिलांच्या इच्छेनुसार आणि मार्गांनुसार शरण आणणे. पण हे दोन कारणांमुळे योग्य नव्हते. पहिलं म्हणजे, तो तरुण आता मोठा झाला होता, त्यामुळे वडिलांना हवा तसा परिणाम साधणं तसंही अशक्य होते. आणि दुसरं म्हणजे, जसं देवाच्या

स्वभावात नाही, तसंच या वडिलांच्या स्वभावातही बळाचा वापर करणं नव्हते . त्यांच्यासाठी, जशी देवासाठी, केवळ तीच सेवा स्वीकारार्ह होती जी एका शिकलेल्या, प्रेमाने भरलेल्या अंत:करणातून उगम पावते.

३. समस्येकडे दुर्लक्ष करणे.

तिसरा पर्याय असा होता की या बदलाकडे शांतपणे दुर्लक्ष करणे जणू ती बंदूक कधी घरात आलीच नव्हती, असं भासवणे आणि प्रत्यक्षात सगळं बरोबर नसतानाही सर्व काही ठीक असल्यासारखं वागणे. पण हा मार्ग योग्य नव्हता, कारण पापाकडे दुर्लक्ष करता येत नाही. प्रेम असो किंवा न्याय, दोघांपैकी कुणीही त्याला परवानगी देणार नाही. अन्याय नेहमी लक्ष मागतोच. त्याला प्रतिसाद मिळणारच तो प्रतिसाद प्रेमाच्या तारक स्पर्शाचा असो किंवा विनाशकारी द्वेषाच्या सूडभावनेचा असो.

हे सर्व पर्याय विचारात घेऊन आणि नाकारल्यानंतर, या देवभक्त माणसाकडे काय करण्याचा पर्याय उरला होता? देव अशाच परिस्थितीत काय करेल?

सर्वात आधी, मुलाच्या वडिलांना हे स्पष्ट जाणवले की, त्याच्या मुलाने स्वतःला, इतर माणसांना, पाळीव जनावरांना आणि वन्य प्राण्यांना मोठ्या धोक्यात टाकले आहे. तो अजून अनुभवहीन आणि अप्रशिक्षित बंदूकधारी असल्यामुळे, त्याला काही गोष्टी शिकणे अत्यंत आवश्यक होते:

- लक्ष्याच्या पलीकडे पाहण्याची आवश्यकता जेणेकरून गोळीच्या रेषेत कुठेही इमारती, माणसं किंवा शेतातील जनावरं नसतील याची खात्री करता येईल.
- शस्त्र सुरक्षितपणे कसं वाहून न्यायचे आणि कुंपणातून जाताना ते कसं हाताळायचे जेणेकरून, अनेकांच्या बाबतीत जसं झाले आहे तसं, त्याने स्वतःला किंवा आपल्या मित्रांना गोळी घालू नये.
- रिकोशेचा (गोळी उडून परत येण्याचा) किती भयानक परिणाम होऊ शकतो जो मूळ लक्ष्याच्या उजवीकडे किंवा डावीकडे दूरवर असलेल्या जीवांनाही धोक्यात आणतो.
- शिकार करताना प्राण्याच्या इतक्या जवळ जाणं की, केवळ त्याला जखमी

करून तो रांगत रांगत लांब जाऊन दीर्घकाळ यातना सहन करावा लागेल, अशी शक्यता कमी व्हावी.

अशा आणि यासारख्या इतरही गोष्टी त्याला शिकवता आल्या असत्या ज्यामुळे त्याने केलेल्या निवडीमुळे स्वतःलाही आणि इतरांनाही होणारे सर्वात गंभीर परिणाम टाळता आले असते.

वडिलांना जरी त्या तरुणाला बंदूक घेण्यापासून वाचवता आले नसते, तरी जर संधी दिली गेली, तर त्या गंभीर परिणामांपासून त्याला वाचवण्यासाठी आवश्यक ते शिक्षण ते नक्की देऊ शकले असते. अगदी वन्य प्राण्यांनाही या तारक सेवेचा फायदा झाला असता कारण त्यांना मृत्यूपासून वाचवता आले नसते, पण वेदनादायक आणि प्रदीर्घ मृत्यूपासून मात्र नक्कीच वाचवता आले असते.

जसा देवाचा आणि त्याच्यासोबत चालणाऱ्यांचा प्रतिसाद नेहमीच तारक प्रेमाचा विस्तार असतो, तसा वर सुचवलेल्या पर्यायांपैकी फक्त एकच मार्ग असा आहे जो प्रभू किंवा या वडिलांनी स्वीकारला असता. देव हा स्वभावतःच तारणारा आहे. तसेच या उदाहरणातील वडीलसुद्धा आहेत. जेव्हा देवाला एखाद्या क्षेत्रात लोकांना वाचवण्यापासून अडथळा निर्माण होतो, तेव्हाही तो उरलेल्या इतर मार्गांनी आपल्या तारणाच्या शक्तीचा वापर करतच राहतो.

म्हणूनच, जेव्हा मुलाच्या वडिलांना हे समजले की दीर्घकाळ चाललेल्या त्यांच्या प्रयत्नांनंतरही त्या तरुणाला शस्त्र हाती घेण्यापासून वाचवण्याचे त्यांचे ध्येय अखेर अपयशी ठरले आहे, तेव्हा त्यांनी हेही ओळखले की मुलाने केलेल्या निवडीचे सर्वात वाईट परिणाम टाळण्यासाठी अजूनही बरेच काही करता येऊ शकते. त्यामुळे, दुःख मनात असतानाही आणि कोमल पण सन्मानपूर्वक वागणे ठेवत, वडिलांनी आपल्या मुलाला एकांतात नेले आणि त्याच्याशी बोलले. त्यांनी मुलाने निवडलेला मार्ग पाहून झालेले आपले दुःख व्यक्त केले, पण त्याचबरोबर त्याला ही खात्री दिली की त्याचा हा निर्णय ते पूर्णपणे मान्य करतील.

त्यांनी सौम्यपणे सुचवले की अशा शस्त्राच्या वापराशी काही गंभीर धोके जोडलेले आहेत, आणि त्या धोक्यांपासून तो फक्त काही विशिष्ट खबरदारी स्वीकारून आणि त्यांचे काटेकोर पालन करूनच सुरक्षित राहू शकतो. वडिलांनी हेही स्पष्ट केले की त्याला अपघातांपासून वाचवण्यासाठी या बाबतीत काळजीपूर्वक मार्गदर्शन करण्यास ते सदैव तयार आहेत.



मुलाला हे पाहून दिलासा वाटला की त्याचे वडील त्याच्यावर संतापाने झडप घालत, अग्नीसारखी कठोर निंदा करत हल्ला करत नाहीत. त्यामुळे तो अशा दबावाचा प्रतिकार करण्यासाठी सज्ज राहिला नाही. उलट, त्याने शिकण्याची तयारी व्यक्त केली. असं करताना त्याने मानवी स्वभावातील त्या विचित्र प्रवृत्तीचे दर्शन घडवले ज्यात माणसं विश्वासाच्या उच्च पातळीशी संबंधित बाबींमध्ये देवाचे पालन करण्यास अनिच्छुक असतात, पण खालच्या पातळ्यांवर मात्र त्याच्या सल्ल्याचे पालन करण्यास तयार होतात.

उदाहरणार्थ, इस्राएली लोक तलवार पूर्णपणे बाजूला ठेवून देवावर संपूर्ण विश्वास ठेवण्यासाठी तयार नव्हते, परंतु तिचे दुष्परिणाम कमी करण्यासाठी आखलेल्या मर्यादांबाबत त्याचे सल्ले त्यांनी मान्य केले आणि त्यानुसार वागले. त्याचप्रमाणे, ज्या मुलाने शस्त्रांचा संपूर्ण त्याग करण्याबाबत आपल्या वडिलांचे तत्त्व सोडून दिले होते, तो त्यांच्या वापराबाबत वडिलांच्या सल्ल्याचा आदर करण्यास मात्र तयार होता.

म्हणून वडिलांनी प्रशिक्षण सत्र सुरू करताना हे ठामपणे अधोरेखित केले की, आता ते जे काही करणार किंवा सांगणार आहेत, त्याचा कुठल्याही प्रकारे असा अर्थ होत नाही की त्यांच्या विचारांमध्ये किंवा भूमिकेत काही बदल झाला आहे.

देवही, आपल्या मुलांनी विध्वंसाची शस्त्रे उचलण्याचा निर्धार केल्यामुळे, अशाच स्थितीत सापडला आहे. त्यानेही अत्यंत गंभीर इशारा दिला आहे की, आपल्या मुलांनी निवडलेल्या गोष्टींचे सर्वात वाईट परिणाम टाळण्यासाठी त्याचे जे प्रयत्न सुरू आहेत, त्याचा अर्थ असा अजिबात नाही की त्याच्यामध्ये काही बदल झाला आहे जरी त्याच्या कृतींचा अर्थ लोकांनी चुकीचा लावला असेल किंवा लावतात.

“कारण मी परमेश्वर आहे, मी बदलणारा नाही” (मलाखी ३:६)

“येशू ख्रिस्त काल, आज व युगानुयुग सारखाच आहे.” (इब्री १३:८)

“ज्याला विकार नाही व जो फिरण्याने छायेत जात नाही” (याकोब १:१७)

माणसांना हे माहीत असूनही की, पाप जगात येण्याआधी देवाने कधीही नाश केला नाही, आणि देवाने स्वतःबद्दल स्पष्टपणे आणि गंभीरपणे हे जाहीर केले असूनही की त्याच्यामध्ये कधीही बदल झाला नाही, तरीही माणसे त्याच्या अखंड वाचविण्याच्या प्रयत्नांकडे असा दृष्टीकोन ठेवतात, जणू तो माणसासारखाच झाला आहे. (स्तोत्र ५०:२१)

आपल्या कथेतल्या वडिलांना मुलाला “दयाळू हत्यारा” कसा व्हावा हे शिकवण्यासाठी स्वतःची पद्धत बदलण्याची काहीच गरज नव्हती. त्याचप्रमाणे, इस्राएली लोक तलवारीचे निर्दयी वापरकर्ते होऊ नयेत म्हणून त्यांना वाचवण्यासाठी देवालाही आपली पद्धत बदलण्याची गरज नव्हती. त्यांच्यापैकी कुणीही जीव घेत नव्हते. ते फक्त जीव वाचवण्याच्या हेतूने प्रयत्न करत होते. आणि जेव्हा जीव वाचवणे शक्य राहिले नाही, तेव्हा त्यांनी शक्य तितक्या यातनांपासून वाचवण्याचा प्रयत्न केला.

आता कल्पना करा त्या गावकऱ्यांपैकी एक, जो वडिलांना बदलवण्यासाठी सर्वात जास्त हट्ट करत होता, तो याच प्रशिक्षण सत्रादरम्यान रस्त्यावरून खाली आला. इतक्या अंतरावरून की, नेमकं काय बोललं जातंय ते त्याला ऐकू येत नव्हते, त्याने वडिलांना मुलाला बंदुकीचे प्रशिक्षण देताना पाहिले.

आता हा माणूस कोणता अंदाज लावेल? आणि तो काय निष्कर्ष काढेल?

त्याच्याकडे कधीही पित्याचा आत्मा नव्हता, त्यामुळे तो त्यांना समजू शकला नाही. त्यामुळे वडील काय करत आहेत याचे योग्य आकलन करणे त्याच्यासाठी अशक्यच होते. उलट, त्याने जे पाहिले त्याचा तो निश्चित असा अर्थ लावेल की, वडिलांमध्ये बदल झाला आहे आणि त्याला त्याचा ठोस पुरावाच मिळाल्याचा त्याला विश्वास बसेल.

तो पाहणारा माणूस, वडिलांनी आपले विचार बदलल्याची बातमी आपल्या शिकारी सहकाऱ्यांना सांगण्यासाठी क्षणाचाही विलंब केला नसेल. त्याने त्यांना सांगितले असेल की आता वडील त्यांच्याच गटातील झाला आहेत म्हणजे एक बंदूकधारी. आणि आपल्या अविश्वासू श्रोत्यांना पुरावा म्हणून त्याने सांगितले असेल की त्याने स्वतः वडिलांना मुलाला बंदूक हाताळण्याचे प्रशिक्षण देताना पाहिले आहे.

वडिलांच्या कृतींबद्दलचा त्याचा अहवाल प्रत्यक्षात खरा असला, कारण नेमके तेच त्याने पाहिले होते, तरीही त्या पुराव्यांवरून त्याने काढलेले

निष्कर्ष हे मात्र सत्याच्या विरुद्ध होते.

जसा त्या वडिलांचा गैरसमज झाला, तसाच देवाचाही झाला आहे.

– Behold Your God, एफ. टी. राईट (१९७९), पृष्ठे ३२८-३३३

तुम्हाला या वडील आणि मुलाच्या गोष्टीत, आणि देवाला त्याच्या लोकांनी घेतलेल्या निर्णयांच्या प्रकाशात त्यांच्याशी वागावे लागल्याच्या परिस्थितीत, यातील समानता दिसते काय? मनुष्य पापात फार खोलवर पडला आहे, आणि त्याच्या मनात असे विचार घट्ट बसले आहेत जे सहजासहजी बदलत नाहीत. आपण ज्या जगात राहतो ते आपल्या विचार करण्याच्या प्रत्येक अंगावर परिणाम करते आपली न्यायाबाबतची समज, कायद्याबाबतची समज, यश, दुष्टता आणि धार्मिकता याबद्दलचे आपले विचार हे सर्व दूषित झाले आहेत. यामध्ये आपण देवाला कसे पाहतो हे समाविष्ट आहे.

# युद्धखोर दृष्टीकोन घट्ट रूजतो

देव आपल्या लोकांसाठी, ज्यांना त्याने मिसरमधून बाहेर काढले आहे, त्यांची फारच काळजी करतो (किंवा बायबलमध्ये नेहमी म्हटल्याप्रमाणे, हेवा करतो). त्याला ठाऊक आहे की मिसरमध्ये राहिल्यामुळे त्यांच्या विचारसरणीवर खोलवर परिणाम झाला आहे, आणि त्यांच्या चुकीच्या विचारांमुळे त्यांना मोठ्या संकटांत आणि अडचणीत जावे लागणार आहे. देवाकडे एक योजना आहे. त्याला ठाऊक आहे की इस्त्राएली त्याच्यापासून घाबरलेले आहेत, तरीसुद्धा त्याला त्यांच्याकडे त्यांच्या कल्पनेतील त्याच स्वरूपात यावे लागेल; अन्यथा ते त्याला घाबरणार आणि सन्मान देणार नाहीत हे देव लोकांना घाबरवू इच्छितो म्हणून नाही, तर कारण जर ह्या लोकांनी जगाचा सृष्टीकर्ता आणि आधारकर्ता म्हणून त्याचे भय आणि त्याला सन्मान देत नसले, तर ते त्यांच्या कल्पनेतील मूर्तींना घाबरतील आणि सन्मान देतील, ज्यामुळे त्यांचेच नुकसान होईल. आपल्याकडून

त्याच्याकडे आणि त्याच्या नियमांकडे दुर्लक्ष होताना पाहून देवाला वेदना होतात, कारण अशा दुर्लक्षाचा परिणाम भविष्यात आपल्यालाच त्रास देणारा ठरणार आहे.

मेघगर्जना होत आहे, विजा चमकत आहेत, कर्ण्याचा नाद होत आहे आणि पर्वतातून धूर चढत आहे असे सर्व लोकांच्या दृष्टीस पडले तेव्हा त्यांचा थरकाप झाला व ते दूर उभे राहिले, आणि मोशेला म्हणाले, “आमच्याशी तूच बोल, म्हणजे आम्ही ऐकू; देव आमच्याशी न बोलो, तो बोलला तर आम्ही मरू.” तेव्हा मोशे लोकांना म्हणाला, “भिऊ नका. कारण तुमची परीक्षा पाहावी आणि त्याचे भय तुमच्या मनात राहून तुम्ही पाप करू नये ह्यासाठी देव आला आहे. लोक दूर उभे राहिले, पण देव निबिड अंधकारात होता, तिकडे मोशे गेला. निर्गम २०: १८-२१

कल्पना करा, देवाचे ते वचन जे आपल्यासाठी जीवन आहे, तेच ते मृत्यू आणणारे आहे असे समजतात! ते देवावर प्रेम करणार नाहीत, पण निदान त्याला घाबरतील काय? नाही, तसे होत नाही, कारण थोड्याच वेळात ते एक सोन्याचे वासरू तयार करतात आणि मोशे त्यांच्या समोर दहा आज्ञा फोडतो. या टप्प्यावर, ज्यांना ही कथा माहीत नाही, ते समजतील की देव इस्राएली लोकांना नाकारेल. पण देवाकडे त्यांचे प्रेम मोशेद्वारे परत जिंकण्याची योजना आहे.

सर्व संकटांतून देव मोशेचे हृदय नम्र करतो. तो मोशेकडून आपल्या लोकांसाठी विनंती करून घेतो, आणि त्यामुळे मोशेला देवाच्या दयेचे अधिक सखोल दर्शन घडते. तो मोशेला आपला स्वभाव दाखवतो “दयाळू व कृपाळू, संयमी...” (निर्गम ३४:६). मोशे तारणाच्या योजनेचे दर्शन घेतो आणि पापांची क्षमा मिळावी व नियम आपल्या अंतःकरणात लिहिला जावा म्हणून आपला पुत्र देण्यात देवाचा चांगुलपणा ओळखतो. मग देव मोशेला हे सुंदर शुभवर्तमान इस्राएली लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी पाठवतो. पण त्यानंतर काहीतरी अत्यंत निराशाजनक घडते.

मग मोशे सीनाय पर्वतावरून उतरला; आणि तो साक्षपटाच्या दोन्ही पाट्या

हातात घेऊन पर्वतावरून उतरून येत असता परमेश्वराशी संभाषण केल्यामुळे आपल्या चेहऱ्यातून तेजाचे किरण निघत आहेत ह्याचे त्याला भान नव्हते. मोशेच्या चेहऱ्यातून तेजाचे किरण निघत आहेत असे अहरोनाने व सर्व इस्राएल लोकांनी पाहिले तेव्हा ते त्याच्याजवळ जायला भ्याले. मोशेने त्यांच्याशी बोलणे संपवल्यावर आपल्या तोंडावर आच्छादन घातले; निर्गम ३४: २९-३०,३३

जेव्हा मोशे देवाबरोबर डोंगरावर बंदिस्त होता, तेव्हा आदामाच्या पतनापासून सुरू झालेली तारणाची योजना त्याला अत्यंत प्रभावी आणि स्पष्ट रीतीने दाखवण्यात आली. त्यावेळी त्याला समजले की इस्त्राएलाच्या संततीच्या प्रवासाचे मार्गदर्शन करणारा तोच देवदूत देहधारी म्हणून प्रगट होणार आहे. देवाचा प्रिय पुत्र, जो पित्याशी एक होता, तो सर्व लोकांना, जे त्याच्यावर विश्वास ठेवतील आणि त्याच्यावर भरोसा करतील, त्यांना देवाशी एक करणार होता. मोशेने बलिदान अर्पणांचा खरा आणि खोल अर्थ ओळखला. ख्रिस्ताने मोशेला सुवार्तेची योजना शिकवली, आणि ख्रिस्तामधून प्रगट झालेल्या सुवार्तेच्या तेजाने मोशेच्या चेहऱ्यावर असा प्रकाश झळकला की लोक त्याच्याकडे पाहू शकले नाहीत.

मोशेला स्वतःलाच आपल्या चेहऱ्यावर प्रतिबिंबित होत असलेल्या त्या तेजाची काहीच जाणीव नव्हती, आणि तो का जवळ येताच इस्त्राएलाची मुले त्याच्यापासून पळून जातात हे त्याला समजले नाही. त्याने त्यांना जवळ बोलावले, पण त्यांनी त्या गौरवाने उजळलेल्या चेहऱ्याकडे पाहण्याची हिंमत केली नाही. जेव्हा मोशेला समजले की लोक त्याच्या चेहऱ्याकडे त्याच्या गौरवामुळे पाहू शकत नाहीत, तेव्हा त्याने आपल्या चेहऱ्यावर एक पडदा झाकला. (ST, 14 मार्च 1878)

इस्त्राएली लोकांनी तो प्रकाश नाकारला. ते देवाचा खरा स्वभाव सहन करू शकले नाहीत, आणि त्यांनी मोशेला आपल्या चेहऱ्यावर पडदा घालण्याची विनंती केली. त्यांनी देवाची महिमा, म्हणजेच त्याचा स्वभाव, नाकारला. त्यांनी असा पक्का निर्णय घेतला की ते देवाशी थेट बोलणार नाहीत किंवा त्याला जसा तो खरा आहे तसा ओळखणार नाहीत म्हणजे असा स्वभाव

असलेला देव, जसा त्याचा पुत्र येशूने पृथ्वीवरील आपल्या आयुष्यात दाखवून दिले होते. इस्त्राएली लोकांनी मनाशी ठरवले होते की ते कनान स्वतःच्या कार्याने घेतील. ते कायद्याची अक्षरशः अंमलबजावणी करतील, पण आत्म्याचा अर्थ पाळणार नाहीत. मग आता देव त्यांना दूर करणार होता काय? नाही, तो त्यांच्या निवडलेल्या मार्गावर त्यांच्यासोबत चालणार होता आणि त्यांच्या मार्गातील चुकांची जाणीव करून देण्यासाठी आणि त्यांनी आपले मार्ग बदलावेत म्हणून त्यांना सतत बोलावत राहणार होता. अशा प्रकारे इस्त्राएल राष्ट्राचा तो दु:खद इतिहास सुरू होतो.

# देव युद्धाच्या दृष्टिकोनातून इस्राएलाशी बोलतो

इस्त्राएली लोकांनी युद्धाचा मार्ग निवडला होता, आणि आता त्यांच्या इतिहासाची धुरा त्यावरच फिरणार होती. ते विविध प्रकारच्या चढ-उतारांनी भरलेल्या संघर्षांतून जाणार होते. जेव्हा ते देवाचे आज्ञापालन करीत, तेव्हा त्यांना युद्धात विजय मिळे. विजय मिळाल्यावर ते गर्विष्ठ होत आणि आत्मविश्वासाने भरून जात. त्यानंतर ते परमेश्वराचा सल्ला न घेता पुढे जात आणि आज्ञापालनात निष्काळजीपणा करू लागत. मग पुढील युद्ध ते हारत. त्यानंतर ते पश्चात्ताप करून पुन्हा देवाजवळ येत.

अशा या चढ-उतारांनी भरलेल्या जीवनात, कधीतरी काय घडत आहे याची त्यांना जाणीव होत असे. हेच त्यांच्या देवाशी असलेल्या नात्याचे आणि त्यांच्या विश्वासाच्या अनुभवाचे स्वरूप बनले. हा चक्रभंग करण्याची असमर्थता आपण इस्त्राएलाच्या सर्वात महान पिढीतसुद्धा पाहतो म्हणजे यहोशवाच्या नेतृत्वाखालील पिढीत. त्यांनी विश्वासाने यरीहो जिंकले, आणि लगेचच असे घडले:

देवाने दिलेल्या त्या महान विजयामुळे इस्त्राएली आत्मविश्वासी बनले. परमेश्वराने त्यांना कनानची भूमी देण्याचे वचन दिले असल्यामुळे ते

निर्धास्त झाले, आणि आपल्या संपूर्ण शक्तीचा उपयोग करून, त्यानंतर नम्रपणे देवाच्या मदतीसाठी मागणी करण्याची आवश्यकता आहे हे त्यांना समजले नाही. आणि हीच एकमेव गोष्ट त्यांना विजय देऊ शकली असती. अगदी यहोशवानेही देवाचा प्रामाणिक सल्ला मिळवण्यासाठी मनापासून प्रार्थना न करता ऐ शहर जिंकण्याची योजना आखली. (ST, 21 एप्रिल 1881, परिच्छेद 2)

इस्त्राएलाच्या मंडळीने स्वतःच्या शक्ती व कौशल्याला उंचावण्यास सुरुवात केली होती, आणि भूमीच्या रहिवाशांकडे तुच्छतेने पाहू लागले होते. यरीहोचा चमत्कारिक पराभव झाला होता, आणि ऐ येथे सहज विजय मिळेल अशी अपेक्षा होती. त्यामुळे केवळ तीन हजार माणसे हल्ल्यासाठी पुरेशी ठरवण्यात आली. इस्त्राएली युद्धात उतरले, पण देव त्यांच्यासोबत असेल याची खात्री नसताना. शत्रूंच्या ठाम प्रतिकारासाठी ते तयार नव्हते, आणि शत्रूंची संख्या व त्यांची सखोल तयारी पाहून ते घाबरले, मागे फिरले आणि पळून गेले. कनानी लोकांनी त्यांचा जोरदार पाठलाग केला आणि त्यांच्यापैकी छत्तीस जण ठार झाले. (ST, 21 एप्रिल 1881, परिच्छेद 3)

या अनपेक्षित पराभवामुळे संपूर्ण इस्त्राएल मंडळीत शोक व निराशा पसरली. यहोशवाने या अपयशाकडे देवाच्या अप्रसन्नतेचे चिन्ह म्हणून पाहिले, आणि अत्यंत नम्रतेने तो करारपेटीसमोर चेहरा ठेवून जमिनीवर कोसळला. इस्त्राएलाचे ज्येष्ठ त्याच्यासोबत या आत्मसमर्पणाच्या कृतीत सहभागी झाले, आणि आश्चर्य व भयाने गप्प बसून ते संध्याकाळपर्यंत तिथेच राहिले. मग यहोशवाने ही गोष्ट परमेश्वरासमोर मनापासून प्रार्थनेत मांडली. (ST, 21 एप्रिल 1881, परिच्छेद 4)

“हाय, हे प्रभु परमेश्वरा, तू हे लोक यार्देन नदी ओलांडून का आणलेस? आम्हाला अमोऱ्यांच्या हाती सोपवून नाश करावयास काय? अहो, आम्ही जर समाधानी राहिलो असतो आणि यार्देनच्या पलीकडेच राहिलो असतो, तर किती बरे झाले असते! हे प्रभु, इस्त्राएल आपल्या शत्रूंपुढे पळून गेल्यावर मी काय सांगू? कारण कनानी आणि या भूमीतील सर्व रहिवासी हे ऐकतील, ते आम्हाला वेढतील आणि पृथ्वीवरून आमचे नाव पुसून टाकतील; आणि मग

तुझ्या महान नावासाठी तू काय करशील?” (ST, 21 एप्रिल 1881, परी 5)

यहोशवाने देवाच्या सन्मानासाठी खरी उत्कटता प्रकट केली, तरीही त्याच्या विनंत्यांमध्ये शंका आणि अविश्वास मिसळलेले होते. देवाने आपले लोक यार्देन ओलांडून फक्त त्यांना मूर्तिपूजकांच्या हाती सोपवावे, ही कल्पना पापी होती, आणि इस्त्राएलाच्या नेत्याला अशोभनीय होती. देवाने आपल्या लोकांच्या सुटकेसाठी केलेल्या महान चमत्कारांच्या पार्श्वभूमीवर, आणि भूमीतील दुष्ट रहिवाशांना हाकलून देताना आपण त्यांच्यासोबत असू, या देवाने वारंवार दिलेल्या वचनाच्या प्रकाशात, यहोशवाच्या खचलेल्या आणि अविश्वासी मनोवृत्तीला माफी नव्हती. (ST, 21 एप्रिल 1881, परी 6)

तरीसुद्धा आपला दयाळू देव या चुकीमुळे आपल्या सेवकावर क्रोधाने उतरला नाही. त्याने यहोशवाची नम्रता आणि प्रार्थना कृपापूर्वक स्वीकारली, त्याच वेळी त्याच्या अविश्वासावर सौम्य रीतीने तंबी दिली, आणि मग त्यांच्या पराभवाचे कारण त्याला उघड केले... (ST, 21 एप्रिल 1881, परी 7)

मी हे सांगतोय ते यहोशवा आणि इस्त्राएली लोकांना कमी लेखण्यासाठी नाही, कारण आपणसुद्धा नेमके तसेच आहोत एलेन व्हाइट यांनी म्हटले आहे की आपण त्या राष्ट्राचा इतिहास पुन्हा जगत आहोत. मला इथे लक्षात आणून द्यायचे आहे की, यहोशवाच्या प्रार्थनेत आतल्या खोल पापीपणाची जाणीव नाही, क्षमेसाठी मागणी नाही. उलट देवावरच आरोप करण्याची छटा आहे: “तू हे लोक यार्देन ओलांडून का आणलेस? आम्हाला अमोऱ्यांच्या हाती सोपवून नाश करावयास काय?” हीच ती मनोवृत्ती होती, ज्यात यहूदी अडकून गेले होते.

देव आपल्या लोकांना कधीच सोडत नाही. त्याने अब्राहाम आणि त्याच्या संततीला वचन दिले आहे. इस्त्राएलला देवाविषयीच्या आपल्या चुकीच्या समजुतीतून बाहेर पडणे नेहमी शक्य होते. सलग अनेक पिढ्या जर खऱ्या उपासनेत राहिल्या असत्या मूर्तिपूजा टाळून, नियमाचा मनापासून अभ्यास करून आणि पापाचा प्रामाणिक पश्चात्ताप करून तर त्यांच्या विश्वासाच्या अनुभवाची पातळी खूपच उंचावली असती. पण तसे झाले नाही.

प्राचीन इस्त्राएल देवाविषयीची आपली समज बदलण्यास तयार नव्हता. उलट, जे संदेष्टे त्यांना अशा शिकवणी देत होते, ज्या त्यांच्या दृष्टीकोनाला पुढे जाऊन अधिक उंच पातळीवर नेण्यासाठी पायरी ठरल्या असत्या, त्या संदेष्ट्यांना त्यांनी दगडांनी ठार केले. म्हणूनच ज्याला देवाच्या पुत्राने संदेष्ट्यांपैकी सर्वात मोठा म्हटले होते तो देवाने जसे वागायला शिकवले होते तसे वागताना दिसला नाही तेव्हा तो संशय आणि निराशेत पडला.

तारणाऱ्याच्या शिष्यांप्रमाणेच, योहान बाप्तिम्या करणाऱ्याला ख्रिस्ताच्या राज्याचे स्वरूप समजले नव्हते. त्याला अपेक्षा होती की येशू दावीदाच्या सिंहासनावर बसेल; पण वेळ पुढे सरकत गेला आणि तारणाऱ्याने राजकीय अधिकाराचा कोणताही दावा केला नाही, तेव्हा योहान गोंधळला आणि व्यथित झाला. त्याने लोकांना सांगितले होते की प्रभूसमोर मार्ग तयार करण्यासाठी यशयाचे भाकीत पूर्ण झाले पाहिजे; पर्वत आणि टेकड्या खाली आणल्या पाहिजेत, वाकडी-तिकडी वाट सरळ केली पाहिजे, आणि खडबडीत जागा सपाट केल्या पाहिजेत. त्याला वाटले होते की मानवी गर्व आणि सत्तेच्या उंच जागा खाली आणल्या जातील. त्याने मसीहाकडे असा दाखला दिला होता की, ज्याच्या हातात वाळवणीची घडी आहे, जो आपला खळ पूर्णपणे स्वच्छ करील, गहू आपल्या कोठारात गोळा करील आणि भुसा विझवता न येणाऱ्या आगीत जाळून टाकील. एलिया संदेष्ट्याप्रमाणे ज्याच्या आत्मा आणि सामर्थ्यात तो इस्त्राएलाकडे आला होता त्याने प्रभूला “आगीने उत्तर देणारा देव” म्हणून प्रकट व्हावा अशी अपेक्षा केली होती. (DA 215.2)

योहान बाप्तिम्याने देवाविषयीची ही समज आपल्या पूर्वजांकडून वारसा म्हणून घेतली होती. आणि जर सर्वांत महान इस्त्राएली लोकांनाच ख्रिस्ताच्या राज्याचे स्वरूप समजले नाही, तर प्राचीन इस्त्राएलाच्या सर्वांत अंधाऱ्या काळात जगणाऱ्यांना ते कसे समजले असते? आता आपण “शास्ते हे पुस्तक” पाहूया.

## तुम्ही जसा न्याय करता, तसा तुमचाही न्याय होईल

यहोशवाच्या काळात, तसेच यहोशवानंतर जिवंत असलेल्या आणि ज्यांनी परमेश्वराची महान कार्ये स्वतःच्या डोळ्यांनी पाहिली होती अशा वयोवृद्धांच्या काळात लोकांनी परमेश्वराची सेवा केली. त्यांच्या पापांचा त्यांनी पश्चात्ताप केला आणि ती क्षमा झाली होती; पण वाईटाचे बी पेरले गेले होते आणि ते उगवून फळ देऊ लागले. अढळ प्रामाणिकतेने व्यतीत झालेले यहोशवाचे जीवन संपले. त्याचा फटकारणारा आणि सावध करणारा आवाज आता ऐकू येईना. यार्देन पार करून आलेले विश्वासू रखवालदार एकामागून एक आपली कवचं उतरवून ठेवू लागले. मग एक नवीन पिढी कार्यक्षेत्रावर आली. लोक देवापासून दूर जाऊ लागले. त्यांच्या उपासनेत चुकीच्या तत्त्वांचा आणि महत्त्वाकांक्षी गर्वाचा मिलाप झाला.

मनुष्यात देवाला विसरण्याची प्रवृत्ती असते, जरी तो स्वतःला त्याची सेवा करत असल्याचा दावा करत असला तरी. नाझरेथच्या लोकांना वाटत होते की ते ख्रिस्तावर प्रेम करतात; पण जेव्हा त्याने त्यांना दाखवून दिले की ते स्वर्गाचे जास्त लाडके नाहीत, जितके अन्यजातीचे लोक आहेत तितकेच ते पण आहेत, तेव्हा त्यांनी त्याला सभास्थानाबाहेर खेचून टेकडीच्या टोकावरून खाली फेकून देण्याचा प्रयत्न केला. ख्रिस्ताने ज्यांना अन्न खाऊ घातले, त्या जमावालाही वाटत होते की ते त्याच्यावर प्रेम करतात; पण जेव्हा त्याने त्यांना सांगितले की, “तुम्हाला नाश पावणाऱ्या भाकरीपेक्षा सार्वकालिक जीवनाची भाकर अधिक महत्त्वाची वाटली पाहिजे,” तेव्हा त्यांचे प्रेम उडून गेले. श्रीमंत तरुण शासकाला वाटत होते की तो तारणार्यावर प्रेम करतो. त्याने त्याच्या ओठांतून पडणारे कृपामय शब्द ऐकले होते आणि त्याची अद्भुत कृत्ये पाहिली होती. पण जेव्हा तारणार्याने सांगितले, “तुझ्याकडे जे काही आहे ते विकून गरीबांना दे; आणि तुला स्वर्गात खजिना मिळेल; आणि ये, माझ्या मागे चल,” तेव्हा तो उदास होऊन निघून गेला कारण त्याला ख्रिस्तापेक्षा आपली मूर्तीप्रमाणे झालेली संपत्तीच अधिक प्रिय होती. शीमोन परूशीला वाटत होते की तो येशूवर प्रेम करतो; पण जेव्हा त्याला कळले की तारणारा त्याला त्या गरीब, दु:खी, पश्चात्तापी स्त्रीइतकंही मान देत नाही, तेव्हा त्याच्या प्रेमाचा भास नाहीसा झाला.

अनेकांना ख्रिस्ताच्या जीवनात प्रशंसनीय गोष्टी दिसतात; पण स्वतःला धार्मिक समजणाऱ्यांच्या अंतःकरणात त्याच्यावरचे खरं प्रेम कधीच वास करू शकत नाही. आपली कुरूपता न पाहणे म्हणजे ख्रिस्ताच्या स्वभावाचे सौंदर्य न पाहणे होय. आपण आपल्या पापीपणाविषयी पूर्णपणे जागे झालो, की आपण ख्रिस्ताची खरी कदर करू शकतो. (रीव्ह्यू अँड हेरल्ड, २५ सप्टेंबर १९००)

मी हा मोठा उतारा उद्धृत केला कारण माझा हेतू हा दाखवण्याचा होता की, त्यांच्यासाठी जसा हा मोठा प्रश्न होता, तसाच तो आपल्यासाठीही आहे. आपण न्यायाधीशांच्या पुस्तकात प्रवेश करताना पाहतो की त्यांच्या पूर्वीच्या चुका अधिक विस्ताराने उलगडल्या जातात. कारण ते आधीच 'वचनदत्त भूमीत' आले आहेत, म्हणून त्यांना वाटते की ते सुरक्षित आहेत. ते देवाने त्यांच्यासाठी काय केले ते विसरतात. आणि त्यांना स्वतःच्या पापीपणाचे, त्या पापीपणाच्या परिणामाचे, आणि ख्रिस्ताच्या राज्याच्या कार्यपद्धतीचे भान राहत नाही. म्हणूनच आपण हा प्रकार पुन्हा पुन्हा घडताना पाहतो.

इस्राएल लोकांनी परमेश्वराच्या दृष्टीने वाईट ते केले, आपला देव परमेश्वर ह्याला ते विसरले आणि बआल व अशेरा ह्या मूर्तींची सेवा करू लागले; म्हणून इस्राएलावर परमेश्वराचा कोप भडकला आणि त्याने त्यांना अराम-नहराईमचा राजा कुशन-रिशाथईम ह्याच्या हाती दिले, आणि इस्राएल लोकांनी आठ वर्षेपर्यंत कुशन-रिशाथईम ह्याचे दास्य केले. इस्राएल लोकांनी परमेश्वराचा धावा केला तेव्हा त्याने त्यांच्यासाठी कालेबाचा धाकटा भाऊ कनाज ह्याचा मुलगा अथनिएल ह्याला सोडवणारा म्हणून उभे केले आणि त्याने त्यांची सुटका केली. त्याच्यावर परमेश्वराचा आत्मा उतरला व तो इस्राएलाचा शास्ता झाला; तो लढाईला निघाला तेव्हा परमेश्वराने अरामाचा राजा कुशन-रिशाथईम ह्याला त्याच्या हाती दिले व त्याच्यावर त्याचे वर्चस्व झाले. शास्ते ३:७-१०

पुन्हा इस्राएल लोक परमेश्वराच्या दृष्टीने वाईट ते करू लागले; त्यांनी परमेश्वराच्या दृष्टीने वाईट ते केले म्हणून परमेश्वराने मवाबाचा राजा

एग्लोन ह्याचे इस्राएलावर वर्चस्व स्थापले. म्हणून इस्राएल लोकांनी मवाबाचा राजा एग्लोन ह्याचे अठरा वर्षे दास्य केले. मग इस्राएल लोकांनी परमेश्वराचा धावा केला, तेव्हा परमेश्वराने गेराचा मुलगा एहूद ह्याला त्यांना सोडवणारा म्हणून उभे केले; तो बन्यामिनी असून डावखुरा होता; त्याच्या हस्ते इस्राएल लोकांनी मवाबाचा राजा एग्लोन ह्याला नजराणा पाठवला. शास्ते ३:१२,१४-१५

एहूद मृत्यू पावल्यावर इस्राएल लोकांनी परमेश्वराच्या दृष्टीने वाईट ते पुन्हा केले. तेव्हा परमेश्वराने याबीन नावाचा कनानाचा राजा जो हासोरात राज्य करत होता त्याच्या हाती त्यांना दिले; त्याचा सेनापती सीसरा हा हरोशेथ-गोयीम येथे राहत असे. त्याच्याकडे नऊशे लोखंडी रथ असून त्याने वीस वर्षे इस्राएल लोकांचा अनन्वित छळ केला, म्हणून त्यांनी परमेश्वराचा धावा केला. शास्ते ४:१-३

कारण इस्राएली लोक देवाकडे युद्ध करणारा आणि शिक्षा देणारा देव म्हणून पाहत होते, त्यामुळे त्यांनी त्याचे सर्व नियम फक्त संकटाच्या काळातच आवश्यक मानले जेव्हा त्यांना वाटायचे की त्यांना शिक्षा होत आहे किंवा ते छळाखाली आहेत. त्यांना हे जाणवले नाही की चांगल्या काळातही देव त्यांची काळजी घेईल, आणि त्यांना हेही कळले नाही की त्याचे नियम त्यांच्या कापणीच्या हंगामात, त्यांच्या कुटुंबांत, त्यांच्या आरोग्यात, तसेच शेजारच्या राष्ट्रांशी असलेल्या त्यांच्या नात्यांमध्येही त्यांना आशीर्वाद देतील. त्यांनी त्या नियमांकडे आशीर्वादाऐवजी ओझं म्हणून पाहिले देवाची कृपा मिळवण्यासाठी करणारी एक गोष्ट म्हणून पहिले.

जेव्हा देशात शांतता असायची, तेव्हा ती यासाठी असायची की देवाने ज्याच्या मार्फत त्यांना मुक्त केले त्या व्यक्तीबद्दल ते आदराने थक्क झाले होते पण त्यांना हे दिसत नव्हते की तो मुक्तिदाता हा फक्त पित्याचा एक माध्यम आहे, आणि सर्व चांगल्या गोष्टींचा खरा स्रोत पिता आहे. देव त्यांच्यासोबत कार्य करण्याचा प्रयत्न करत होता, पण त्यांच्या अविश्वासामुळे त्यांनी देवाच्या कार्याला मर्यादा आणल्या. देव त्यांना स्वतःबद्दल वेगळ्या दृष्टीने पाहायला भाग पाडणार नव्हता. देवावर प्रेम करण्याची त्यांची असमर्थता

याचा अर्थ असा होता की, त्यांच्यासाठी आपल्या शत्रूंवर प्रेम करणे अशक्य होते.

त्यांच्या धर्मत्याग आणि प्रचंड दुष्टतेनंतरही, परमेश्वराने आपल्या लोकांना पूर्णपणे सोडून दिले नाही. वेळोवेळी त्याने विश्वासू आणि शूर पुरुष उभे केले, जे त्यांना त्यांच्या शत्रूंच्या जुलूमातून मुक्त करतील. पण लोकांची अंत:करणे इतकी वाईट मार्गाने भ्रष्ट झाली होती की श्रद्धेची किंवा उपासनेची शुद्धता पुन्हा प्रस्थापित करणे हे सोपं काम नव्हते. जेव्हा तो मुक्तिदाता मरण पावत असे आणि लोक त्याच्या अधिकारातून मुक्त होत, तेव्हा ते पुन्हा मूर्तिपूजेकडे वळत.

परमेश्वर आपल्या लोकांना अशा स्थितीत आणू इच्छित होता की तो त्यांच्या वतीने आपली शक्ती प्रकट करू शकेल; पण त्यांच्या अंत:करणांचा कल देवापासून दूर जाण्याकडे होता, आणि ते त्याच्या आज्ञांना अधीन होण्यास तयार नव्हते. काय आंधळेपणा! काय अकल्पनीय मूर्खपणा! आणि तितकाच न कळणारा प्रकार म्हणजे असे लोक, ज्यांना देवाने बौद्धिक देणग्या दिल्या आहेत आणि भौतिक आशीर्वादांनी वेढले आहे, तरीसुद्धा जे देवाची कृपा आणि त्याच्या अनंत प्रेमाऐवजी सांसारिक लाभांना, आणि अगदी नीच वासना पूर्ण करण्यालाही, प्राधान्य देतात. (साईन्स ऑफ द टाइम्स, ९ जून १८८१)

देव त्यांना सोडवायचा, जेव्हा ते त्याच्याकडे विनंती करायचे पण तेही त्यांच्या देवाच्या स्वभावाविषयीच्या त्यांच्या स्वतःच्या समजुतीनुसारच होत असे. म्हणूनच आपण पाहतो की त्यांचे न्यायाधीश जसे युद्धातील सेनानी होते. यामुळे नंतर त्यांना वाटू लागले की मसीहाही तसाच असेल, आणि त्यांना हे कधीच समजले नाही की देव फक्त त्यांच्या चौकटीत राहून कार्य करत होता, आणि स्वतः देव प्रत्यक्षात त्यांच्या सारखा नव्हता.

एखाद्या मनुष्याने त्यांचा न्याय करावा आणि त्यांना योग्य मार्गावर ठेवावे, यावर अवलंबून राहणे हे दाखवत होते की त्यांच्या अंत:करणात देवाचा नियम नव्हता. देवाऐवजी माणूस त्यांचा नेता व्हावा, किंवा देवाच्या आज्ञांचे पालन

करण्याची जबाबदारी लोकांवरून कमी होऊन त्या नेत्यावर पडावी अशी मानसिकता शेवटी त्यांच्या राजाच्या मागणीत उघड झाली.

## इस्राएल राजाची मागणी करतो

